Abhangatrang - ISBN No. 978-81-940772-2-0



श्री संत जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या निवडक अभंगांचे
भावार्थासह विवेचन

# अभंगतरंग


**संपादक** :

प्रा.डॉ.विवेकानंद ससाणे



**ज्ञानज्योती प्रकाशन, पुणे**

- अभंगतरंग

- प्रथमावृत्ती : जुलै २०१९

- ISBN : 978-81-940772-2-0

- प्रकाशक :
  ज्ञानज्योती प्रकाशन,
  ३११/३, गल्ली क्र.२, ससाणेनगर,
  हडपसर, पुणे-४११०२८.
  दूरध्वनी : ९८५०२१३९४२

- किंमत : रू. ९०/-


माझ्या जीवनाला आकार देणारे माझे वडील

*कै.श्री. सुभाष अर्जुन ससाणे*

यांच्या पवित्र स्मृतींना सादर समर्पित...!

## अनुक्रमणिका


भूमिका

१. तुकारामांचे अभंग : प्रेरणा, स्वरूप व वैशिष्ट्ये /७

२. निवडक अभंग /१५

३. परिशिष्ट

अ) निवडक अंकातील प्रकाशित लेखन /६६

आ) अभंग सूची /८३


## १. तुकारामांचे अभंग : प्रेरणा, स्वरूप व वैशिष्ट्ये

सन १६०८ मध्ये इंद्रायणीकाठी वसलेल्या देहूमध्ये तुकारामांचा जन्म झाला. ज्या इंद्रायणीच्या तीरावर भागवत संप्रदायाचा पाया रचला गेला त्याच इंद्रायणीने भागवत संप्रदायाला झळाळता कळस दिला. तुकारामांनी संत, कवी आणि समाजसुधारक अशा तिन्ही अंगामध्ये आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. आपल्या विचारांत आणि आचरणात एकरूपता ठेवून तुकारामांनी सर्वसामान्यांना उन्नतीचा मार्ग दाखविला ज्यांना धर्म माहित नव्हता त्यांना खरा धर्म समजावून सांगितला. समाजाला उन्नतावस्थेत नेण्यासाठी रात्रंदिवस प्रयत्न केले. आपल्या अमोघ वाणीने समाजाला मंत्रमुग्ध करून समाजात सद्विचारांची पेरणी केली. आजही तुकारामांच्या साहित्याची मोहिनी सर्वसामान्यांपासून विद्वज्जनांपर्यंत सर्वांवर आहे. तुकारामांचे साहित्य आजही सर्वसामान्यांच्या जीवनाला आधार बनलेले आहे.

तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे तुकारामांचे काव्य आणि जीवन यांच्यात असलेली एकरूपता. तुकारामांना जीवन जगताना जे अनुभव आले तेच अनुभव त्यांच्या अभंगांमधून व्यक्त होताना दिसतात. त्यामुळे तुकारामांच्या अभंगांमधून तुकारामांचे जीवन सहज-स्वाभाविकपणे वाचकांपुढे उलगडत जाते. सर्वसामान्य संसारी व्यक्ती ते साक्षात्कारी संत हा त्यांचा जो आध्यात्मिक प्रवास आहे तो त्यांच्याच अभंगांमधून व्यक्त होतो. म्हणून त्यांच्या अभंगांचे अध्ययन करताना तुकारामंचे वैयक्तिक जीवन जसे उलगडत जाते तसे तत्कालीन समाजरचनाही या अभंगांमधून उलगडत जाते. तत्कालीन समाजव्यवस्थेचा नेमका वेध तुकारामांनी आपल्या अभंगांमधून घेतलेला आहे. तुकारामांच्या अभंगांचे अध्ययन करताना तुकारामांच्या अभंगरचनेचे सामर्थ्य, त्या रचनेचे वेगळेपण, अभंगाची वैशिष्ट्ये आपल्याला सहजपणे जाणवतात. या दृष्टीने तुकारामांच्या अभंगरचनेची प्रेरणा, स्वरूप आणि वैशिष्ट्ये पाहणे गरजेचे आहे.

**तुकारामांच्या काव्यामागील प्रेरणा :**

तुकारामांनी विपुल प्रमाणात अभंग लेखन केलेले आहे. त्यांनी नेमके


मराठी
मंडळ